
शोखियाँ सपना बन साजन आये...



बॅनर : ॲम्बिशस पिक्चर्स. निर्माता / दिग्द. : केदार शर्मा. गीतकार : केदार शर्मा. हिंमतराय शर्मा. संगीत : जमाल सेन. कलाकार : सुरैया, प्रेमनाथ, जीवन, कमलेश कुमारी, चौबेजी, राजेंद्र सिंग, रमेश सिन्हा, रजनी वगैरे.

प्रदर्शन : एप्रिल १९५२.

गीते व गीतकार

१) आई बरखा बहार पडे बूंदन फुहार... लता / प्रमोदिनी दीक्षित / कोरस - केदार शर्मा.

२) ओ दूर देश से आजा रे, मोसे रहा नही जाय... लता / सुरैया- केदार शर्मा.

३) सोई कलिया हँस पडी... सपना बन साजन आए... लता-

४) पयामे-इश्करा मन अज... बेदार हुई कलियाँ... राजकुमारी- हिंमतराय शर्मा

५) रातों की नींद छीन ली, आँखो के इंतजार ने... सुरैया- केदार शर्मा.

६) आओ सजन नयन में... तू तो आजा रे नयनो में बस जारे-
केदार शर्मा - सुरैया / शंभू सेन.

७) रण में गरजे केसरी, एजी थरथर काँपे आसमान...
- हिंमतराय शर्मा सुरैया / कोरस.

८) आधी आधी रात ढोला, पिछले पहर को जी हाँ...
- केदार शर्मा. सुरैया / कोरस.

बोटावर मोजण्याइतक्या चित्रपटांना संगीत देऊन आणि त्यातही स्वत:चा विशिष्ट ठसा उमटवून कायम उपेक्षा पदरी पडलेल्या अनेक गुणी संगीतकारांच्या मालिकेत जुन्या दर्दी रसिकांकडून अजून एक नाव हमखास घेतलं जातं. जमाल सेन. आज पार विस्मृतीत जमा झालेल्या या संगीतकाराने आपल्या कारकीर्दीच्या सलामीलाच 'शोखियाँ' चित्रपटात लताचं एक सुंदर नि तितकंच हळुवार सोलो दिलं होतं.

सोई कलियाँ हँस पडी, झुके लाज से नैन
वीणा की झंकार तार में, तडपन लागे बैन
सपना बन साजन आए...

निर्माता - दिग्दर्शक केदार शर्मा यांनी स्वत:च रचलेल्या या उत्कट काव्यातील शब्दांत संगीतकार जमाल सेनने हळुवारपणे तोलून धरेल एवढा मोजकाच साज दिला होता. थोडासा हार्मोनियम, मध्येच ऐकू येणारी मृदुंगाची थाप आणि गीतातील 'नैना भर आए, शरमाए...' या ओळींसमवेत कानावर पडणारे बासरीचे हलके सूर. बस्स! जमाल सेनने आपली ताकद या एकाच गाण्यात अशी काय दाखवून दिली आहे की, केवळ या गीतामुळेच 'शोखियाँ' आजही स्मृतीत रेंगाळतो आहे.

हा चित्रपट तसा सागरी आक्रमणाची ऐतिहासिक कथा सांगणारा. मोगल सम्राट बाबर उत्तरेकडे आपलं साम्राज्य वाढविण्यात गुंतला असताना दक्षिणेकडे मात्र पोर्तुगीजांची समुद्रमार्गे आक्रमणे चालूच होती. इथंच वसलेल्या एका साम्राज्याचा अधिपती तांबा (चौबेजी) या नेकदिल राजाने पोर्तुगीजांच्या आक्रमणाविरुद्ध देलेल्या लढ्याची ही शौर्य कथा.

या राजाने संगीतनगर हे आपलं शेजारचं संस्थान धाकटा भाऊ रंगीले राव (राजेंद्र सिंग) याच्याकडे सुपूर्द केलेलं असतं. शिवाय या रंगीले रावसोबत राजाची एकुलती एक मुलगी चिंतामणी (कमलेश कुमारी) हीसुद्धा संगीत नगरमध्येच राहत असते. चिंतामणी आपल्या वडिलांच्या राज्यात न राहण्याचं कारण म्हणजे राजाचा विश्वासू सेनापती रणबीर (प्रेमनाथ). आपल्या मुलीने या रणबीरशी विवाह करावा ही वडिलांची इच्छा चिंतामणीला मान्य नसते. मुळातच घमेंडखोर स्वभावाच्या या मुलीला कुठल्याही बंधनात अडकून न पडता स्वतंत्र राहून इतरांवर हुकमत गाजविण्याची भारी हौस आणि तिच्या या सुप्त भावनेला धूर्त कावेबाज शेरसिंग (जीवन) पद्धतशीरपणे खतपाणी घालतो. राजाच्या नकळत हा देशद्रोही गोड बोलून तिची मर्जी संपादन करतो.

इकडे मात्र सेनापती रणबीर आणि त्याचा जोडीदार बाबा गनी (बी. एम. व्यास) हे दोघेही निष्ठेने राजाला त्याच्या कारभारात मदत करीत असतात. दरम्यान, अचानक पोर्तुगीजांचं मोठं आक्रमण होतं. राजा त्याविरुद्ध लढा देण्यास सिद्ध होतो. मात्र पोर्तुगीजांनी राज्याचा खजिना लुटू नये, तो सुरक्षित राहावा म्हणून राजा एक शक्कल लढवितो. हा खजिना सुरक्षितपणे संगीतनगरला आपल्या भावाकडे पाठविण्याची अवघड जबाबदारी तो सेनापती रणबीर, त्याचा साथीदार बाबा नगी आणि शेरसिंग या तिघांवर सोपवतो आणि स्वत: आपल्या सैन्यासह पोर्तुगीजांच्या आक्रमणावर चालून जातो.

हा खजिना संगीतनगरला पोहोचण्यापूर्वी वाटेतच लुटता यावा म्हणून धूर्त शेरसिंग एक चाल खेळतो. गरीब आदिवासी टोळीतील एक देखणी युवती साँवली (सुरैया) हिला हाताशी धरून दोन सुवर्णमुद्रांच्या मोबदल्यात तिने आपल्या सौंदर्याच्या बळावर रणबीरला भुरळ पाडून त्याचा खून करावा. पण घडतं भलतंच. रणबीरचा खून करायला आलेली साँवली त्याच्यावर लुब्ध होऊन स्वत:च प्रेमात पडते आणि त्याची कायमची गुलाम होते. खजिना सुरक्षितपणे संगीतनगरला पोहोचतो. तिथं रणबीर राजकन्या चिंतामणीला भेटून आदरापोटी आपली प्रेयसी साँवली दासी म्हणून तिला भेट देतो आणि कर्तव्यपूर्तीसाठी पुन्हा राजाकडे परततो.

खजिना लुटण्याचा आपला डाव फसल्यामुळे चिडलेला शेरसिंग आता दुसरी चाल खेळतो. त्यात तो खुद्द चिंतामणीलाही सामिल करून घेतो. राजाचा भाऊ रंगीलेराव हा नावाप्रमाणेच रंगेल आणि भोगविलासी. तेव्हा पोर्तुगीजांशी हातमिळवणी करून त्यांच्यातर्फे एक सुंदर इजिप्तशियन युवती या रंगीलेरावाला पेश करायची आणि त्यात तो दंग असताना पोर्तुगीजांकडूनच त्याची हत्या घडवून आणायची. सत्तेचा हव्यास बाळगणारी चिंतामणी या अघोरी कृत्यालाही तयार होते.

इकडे चिंतामणीची दासी म्हणून राहिलेल्या साँवलीला शेरसिंगच्या या कट-कारस्थानाचा सुगावा लागतो. हा कट उधळून लावण्यासाठी ती मदतीच्या अपेक्षेने रणबीरकडे धाव घेते. घोड्यावरून भरधाव वेगाने जात असताना वाटेतच एका तळ्याकाठी तिची रणबीरशी गाठ पडते. लढाईत जबर जखमी झालेल्या राजाची रणबीर तिथं देखभाल करीत असतो. साँवलीकडून शेरसिंग आणि चिंतामणीच्या कटाची बातमी ऐकताच पोटची पोरच विश्वासघातकी नि देशद्रोही निघाली. याचा राजाला धक्का बसतो आणि दु:खावेगाने तो छातीत खंजीर खुपसून आत्महत्या करतो. या गोंधळात शेरसिंगचा कट यशस्वी होऊन संगीतनगरची सारी सत्ता चिंतामणीच्या हाती येते.

आता पोर्तुगीजांविरुद्ध लढण्याची आणि चिंतामणीला योग्य शासन करण्याची रणबीर प्रतिज्ञा करतो. पण त्यासाठी त्याला साँवलीच्या आदिवासी टोळीचं मनुष्यबळ हवं असतं. म्हणून तो साँवलीशी रीतसर लग्न करतो. सारे आदिवासी संगीतनगरवर चाल करून येतात. या हल्ल्यात चिंतामणी मारली जाते. लबाड शेरसिंग साऱ्यांची नजर चुकवून पळ काढतो आणि पोर्तुगीजांना येऊन मिळतो. चिंतामणी तर गेलेलीच असते. म्हणून तो पोर्तुगीजांना संपूर्ण संगीतनगरच उद्ध्वस्त करायला सांगतो. घनघोर युद्ध होतं आणि त्यात रणबीर नि त्याची साँवली दोघेही मृत्युमुखी पडतात.

ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या या चित्रपटातील नायक-नायिकेची ट्रॅजिडी प्रेक्षकांना रुचली नाही आणि दिग्दर्शक केदार शर्माचा 'शोखियाँ' पडेल ठरला. मात्र त्यात खरी बाजी मारली संगीतकार जमाल सेनने. 'सपना बन साजन आए' या लताच्या अप्रतिम सोलोबरोबरच त्याने सुरैया आणि लता हे दोन दिव्य आवाज 'दूर देश से आजारे...' या द्वंद्वगीतात एकत्र आणून जणू दुग्धशर्करा योगच साधला होता. राजस्थानचा हा मुस्लिम संगीतकार तसा प्रचंड ताकदीचा. कमाल अमरोहीच्या 'दायरा'मध्येही त्याने 'देवता तुम हो मेरा सहारा...' (रफी/ मुबारक बेगम) हे सुंदर गाणे देऊन स्वत:ची प्रतिमा दाखवली होती. परंतु फिल्म इंडस्ट्रितल्या हिणकस राजकारणाचा तो बळी ठरला.

चित्रपट संगीताच्या ऐन सुवर्णयुगात आगमन होऊनही जमाल सेनच्या वाट्याला 'दायरा, धर्म पत्नी, भगवानचा 'रंगीला', 'पतितपावन'सारखा भक्तीरसपट असे आठ-दहा चित्रपटच आले. 'शोखियाँ'मध्ये आदिवासी जमातीलाही महत्त्व असल्यामुळे जमालसेनने त्यात आदिवासी लोकसंगीताचाही खुबीने वापर केला होता. अर्थात चित्रपटच अपयशी ठरल्यामुळे या संगीतकाराची कामगिरी फारशी नजरेत भरली नाही.

जमालसेनचे अखेरचे दिवस अतिशय वाईट अवस्थेत गेले. कुणाला सांगून खरे वाटणार नाही. पण हा गुणी संगीतकार आपल्या शेवटच्या काळात पश्चिम रेल्वेच्या बोरिवली स्टेशनच्या फलाटावर बेवारशी अवस्थेत झोपलेला असे. आजच्या पिढीला तर तो ठाऊक नाहीच. पण त्याची ओळखच पटवून द्यायची झाल्यास हल्लीच्या 'दिलीप सेन-समीर सेन' या संगीतकारातील समीरचे ते अब्बाजान होते.

■ विजय शिंगोर्णीकर